उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, वाशिम.
सिव्हील लाईन रोड, सर्किट हाऊस जवळ वाशिम,
ता. जि. वाशिम.
कार्यालय दुरध्वनी क्र.07252-232545.
ई-मेल- sdpowashim.wsm@mahapolice.gov.in

# *प्रेसनोट*

दि. 31/05/2022

## उपविभागीय पोलीस अधिकारी, कार्यालय येथील पोलीस पथकाची जुगार अड्डयावर कारवाई

वाशिम जिल्हयातील अवैध धंदे करणाऱ्यांवर कार्यवाही करुन जिल्यात शांतता आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता मा. पोलीस अधिक्षक श्री. बच्चन सिंह यांचे कडुन अधिनस्त सर्वच पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा तसेच तिन्ही उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी यांना लेखी, तोंडी तसेच बैठकांचे आयोजन करुन नियमीत आदेश करुन सुचना व मार्गदर्शन केल्या जात आहे. त्याच प्रमाणे वेळोवेळी विशेष पथकामार्फत अवैध धंद्यावर कारवाई करुन अवैध धंदे करणारे इसमांवर कडक कायदेशिर कार्यवाही करण्यात येत आहे.

दि. 30/05/2022 रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी, सुनिलकुमार पुजारी यांचे विशेष पोलीस पथकाला गुप्त बातमीदाराकडुन माहीती मिळाली की, वाशिम शहरातील सवेरा कॉलनी या भागात रेल्वे पटरीला लागुन असलेल्या टिन शेडच्या बाजुला 05-07 इसम 52 ताश पत्याचा तिन पानी जुगार खेळ पैशावर खेळत आहेत. सदर माहीती त्यांनी श्री. सुनिलकुमार पुजारी, उपविभागीय पोलीस अधिकारी वाशिम यांना दिली. उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांचे मार्गदर्शनात त्यांचे विशेष पथकामार्फत वाशिम शहरातील सवेरा कॉलनी या भागात रेल्वे पटरीला लागुन असलेल्या, टिन शेडच्या बाजुला, मोकळया जागेत खेळत असलेल्या जुगार अड्डयावर, रेल्वे पटरीचे मार्गाने लपत छपत जावुन धाड टाकली असता, 52 ताश पत्याचा तिन पानी जुगार खेळ खेळणारे एकुण 07 इसमांना पंचासमक्ष जागीच पकडले. सदर इसम 52 ताश पत्याचा तिन पानी जुगार खेळ खेळत असल्याची खात्री झाल्याने, त्यांचेकडुन व घटनास्थळावरुन जुगार साहीत्य, नगदी रुपये, मोटार सायकल असा एकुण 1,62,830/- रु चा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला. सदर इसमांचे कृत्य हे कलम 12 (अ) म.जु.का. अन्वये गुन्हा होत असल्याने त्यांचेविरुध्द पोलीस स्टेशन वाशिम शहर येथे रितसर गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदर कार्यवाहीत मा.पोलीस अधिक्षक सा. वाशिम, उपविभागीय पोलीस अधिकारी सा. वाशिम यांचे मार्गदर्शनात उपविभागीय पोलीस अधिकारी, वाशिम यांचे विशेष पथक इन्चार्ज पोऊपनी राहुल चौधरी , नापोकाँ/379 हरिभाऊ कालापाड, पोकाँ/280 महादेव भिमटे, पोकाँ/743 निकीन चोपडे, पोकाँ/1261 मनिष बिडवे यांनी कामगीरी बजावली आहे.

(राहुल चौधरी)
वाचक पोलीस उपनिरिक्षक,
उप वि.पोलीस अधिकारी, कार्या. वाशिम

Scanned with CamScanner